स्थापना ] [ २८-६-१९९१

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई–४०० ००४.

रजिस्टर नं. बी. ओ. एम./डब्लु. डी./आर. एस. आर./सी. आर./४१५/९१–९२

# पहिला वार्षिक अहवाल

## १९९१–९२

– कार्यालय –

१०, अतुल निवास, पहिला मजला, खेतवाडी ७ वी गल्ली,
मुंबई – ४०० ००४.

## उद्घाटन समारंभ क्षणचित्रे




**उद्घाटण सोहळा समारंभ :** व्यासपीठावरील मान्यवर श्री. वसंतराव ननावरे, कै. बापूरावजी शेटे, श्री. शिवाजीराव देशमुख सहकारमंत्री श्री. जनार्दन निकम, श्री. वसंतराव शिंदे, श्री. श्रीरंग पिंपळे व इतर मान्यवर.



**महाराष्ट्राचे सहकार मंत्री :** मा. ना. श्री. शिवाजीराव देशमुख यांच्या हस्ते संस्था नोंदणी प्रमाणपत्र स्विकारताना संस्थेचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर वांगडे, कै. बापूरावजी शेटे, श्री. वसंतराव ननावरे, श्री. महादेव शेलार, श्री. श्रीरंग आरगडे व इतर मान्यवर.

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई-४०० ००४.

## —: सभा सुचना :—

पतपेढीच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, पतपेढीची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ९-८-१९९२ रोजी दुपारी ठिक ४-०० वा. "आश्रय" अभ्यासिका, खेतवाडी बॅक रोड, मुंबई-४०० ००४. या ठिकाणी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही नम्र विनंती.

## —: सभेपुढील विषय :—

(१) मागील सर्वसाधारण सभेचा वृतांत वाचून कायम करणे.

(२) ३१ मार्च १९९२ अखेर संपणाऱ्या वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकारणे.

(३) सन ९२-९३ करीता अंतर्गत हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरवणे.

(४) कायदेविषयक सल्लागारांची नेमणूक करणे.

(५) संस्थेचे पोट नियम क्र. अ. १.१ मध्ये दुरुस्ती करणे.

(६) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन

मुंबई दिनांक २१-७-१९९२.

**श्री. भरत शिवराम पिंपळे**
चिटणीस

---

## —: विशेष सुचना :—

(१) कोणत्याही सभासदास सुचना मांडावयाच्या असल्यास अशा लेखी सुचना दिनांक ४-८-१९९२ पर्यंत पतपेढीच्या कार्यालयात आणून याव्यात.

(२) गणसंखे अभावी सभा तहकुब झाल्यास ही सभा त्याच ठिकाणी वरील विषयावर विचार करण्यासाठी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. या सभेस गणसंखेची आवश्यकता भासणार नाही.

(३) सभासदांनी आपले कर्जाचे हप्ते प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपूर्वी भरावेत.

(४) सभेस येताना सभासदानी कृपया आपली वार्षिक अहवालाची प्रत सोबत घेऊन यावे.

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई-४०० ००४.

## —: कार्यकारी मंडळ :—

(१९९१-९२ ते १९९३-९४)

अध्यक्ष : श्री. ज्ञानेश्वर बापूसाहेब वांगडे (वि. का. द.)
उपाध्यक्ष : ,, रामचंद्र बळीराम वाईकर
चिटणीस : ,, भरत शिवराम पिंपळे
खजिनदार : ,, रामचंद्र धोंडीबा वांगडे

### ❋ संचालक ❋

श्री. शंकर विश्राम आरगडे
,, बबन ज्ञानू पाटील
,, प्रकाश तुकाराम निकम
श्री. विनोद केशव पितळे
,, विजय रामचंद्र शेलार
,, सुरेश भाऊसो पवार
श्री. नारायण रामचंद्र सोनावणे

### ❋ अंतर्गत हिशेब तपासणीस ❋

श्री. प्रकाश पुरुषोत्तम बांबर्डेकर (चार्टर्ड अकाऊंटंट)

### ❋ दैनंदिन बचत एजंट ❋

श्री. सुहास सुब्राय गोकर्ण
,, रमेश शामराव निकम
श्री. दशरथ रामचंद्र वांगडे
,, सोमनाथ विश्राम आरगडे
श्री. संजय दादा शेडगे

### —: कर्मचारी :—

श्री दशरथ रामचंद्र वांगडे
श्री. अशोक कृष्णा माने
कु. छाया शंकर जाधव

### —: बँकर्स :—

मुंबई जिल्हा मध्य. सहकारी बँक लिमिटेड
पलटन रोड शाखा, मुंबई

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई-४०० ००४.

## —: मनोगत :—

**सन्माननीय सभासद बंधू भगिनीनो** :-

शिवसह्याद्री सहकारी पतपेढीचा पहिला अहवाल पतपेढीच्या सर्व माननीय सभासदांना सादर करताना कार्यकारी मंडळास सार्थ अभिमान आणि आनंद वाटत आहे.

दीनदुबळ्यांना व श्रमजीवीकाना स्वबळांवर त्यांच्या अर्थिक गरजा वाजवी व्याज दराने भागविता याव्यात म्हणून अहोरात्र धडपणारे थोर समाज सेवक **कै. रावसाहेब वांगडे** (मास्तर) ह्यांचे अपुरे स्वप्न पुरे करण्या करिता सर्व सामान्य कार्यकर्ते व मित्रजन ह्यांनी पतपेढी स्थापनेचा दृढ निश्चय केला. आपण आम्हास प्रोत्साहन देऊन व विश्वास दाखवून पतपेढीचे भाग (शेअर्स) घेतले त्याचमुळे अल्पावधीत अपेक्षित भाग भांडवल जमा झाले आणि त्याच प्रमाणे संस्थेचे नोंदणीपत्र दि. १–७–१९९१ रोजी मिळाले.

महाराष्ट्राचे सहकार मंत्री **ना. मा. श्री. शिवाजीराव देशमुख** यांच्या शुभ हस्ते तसेच आपले आदरणीय मार्गदर्शक दि. सतारा सहकारी बँक लि. चे संस्थापक **कै. श्री. बाबुरावजी शेटे** (मा. महापौर) यांच्या अध्यक्षतेखाली आपल्या पतपेढीचा छोटासा कल्पवृक्ष दि. ८–९–९१ रोजी लावण्यात आला.

आपल्या पतसंस्थेचा विकास म्हणजे आपला विकास असे मानून उत्साहाने सहकार्य केले पाहीजे म्हणजे आपणास प्रगतीचे अधिकधिक टप्पे गाठण्यास अवघड जाणार नाही. कर्तव्य भावनेने सहकार्य करावे अशी आपणांस माझी नम्र विनंती आहे.

सर्व कार्यकर्त्यांचे, हितचिंतकांचे, ठेवीदाराचे व सभासद बंधू भगिनींचे तसेच **श्री. मोहनराव कदम** (संचालक मु. सहकारी बोर्ड) व **श्री. भास्करराव साळुंखे** (संचालक अजिंक्य ना. स. पतपेढी) ह्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानून माझे मनोगत पूर्ण करतो. तत्पूर्वी आपणा सर्वांकडून असेच सहकार्य मिळत राहील अशी नम्र अपेक्षा करतो.

आपला नम्र,

**श्री. ज्ञानेश्वर बापूसाहेब वांगडे** (बि. का. दं.)

अध्यक्ष

**शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित**

**मुंबई – ४.**

दिनांक २१–७–१९९१

मुंबई – ४.

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई-४०० ००४.

## : सन्माननिय सभासद बंधु - भगिनिंनो :

आपल्या पतपेढीचा सन १९९१-९२ सालचा पहिला (१ला) वार्षिक अहवाल व दि ३१-३-१९९२ अखेर संपणाऱ्या वर्षाचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने आपणासमोर सादर करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

### संचालक मंडळ :-

आपल्या संस्थेचे संचालक मंडळ ११ सदस्यांचे आहे पहिल्या वर्षात संचालक मंडळाच्या ९ सभा झाल्या प्रत्येक सभेस हजर राहीलेल्या सदस्यांची सरासरी ९०% पर्यंत आहे.

### भागधारक :-

३१ मार्च १९९२ रोजी पतपेढीचे एकुण भागधारक ७६१ झाले आहेत.

### भाग भांडवल :-

संस्थेचे अधिकृत भाग भांडवल ५ लाख रुपये आहे. ३१ मार्च १९९२ अखेर पतपेढीचे वसुल भाग भांडवल १,१०,५५०/- इतके झाले.

### कर्ज :-

आज मिती पर्यंत संस्थेने गरजू सभासदांना वैयक्तिक जामीनावर मध्यम मुदतीची व ठेवीवरील कर्जे दिली आहेत.

सभासदांना रु. ५,४५,०००/- एवढ्या रकमेचे कर्ज वितरण करण्यात आले. रु. ४०,८२५/- दिनांक ३१-३-९२ अखेर कर्ज वसुली, रु ५,०४,१७५/-०० दिनांक ३१-३-९२ अखेर सभासदाकडून येणे कर्ज.

### ठेवी :-

संस्थेने विविध प्रकारच्या ठेवी स्विकारल्या असुन ३१ मार्च १९९२ अखेर शिल्लक ठेवी पुढील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| (१) | बचत ठेव | रु. ५८,७०४-९७ |
| (२) | मुदत व दामदुप्पट ठेव | रु. १,५९,२००-०० |
| (३) | आवर्त ठेव | रु. १३,६९७ ०० |
| (४) | दैनंदिन ठेव | रु. १,७४,५५५-०० |
| (४) | सक्तीची बचत ठेव | रु. २८,२४३-६३ |

संस्थेची वसुली चांगली असुन संस्था स्थापनेच्या प्राथमिक मुळ खर्चामुळे यावर्षी संस्थेस रु. १०,९४७-५६ या तोट्याचा सामना करावा लागला आहे.

## --: आभार :--

(१) **मा. ना. श्री. शिवाजीराव देशमुख** महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री, अध्यक्ष महाराष्ट्र प्र. कॉं. कमेटी.

(२) **मा. प्रभाकरजी कुंटे** (माजी अध्यक्ष म्हाडा)

(३) **श्री. नंदकुमार जंत्रे साहेब** विभागीय सहनिबंधक.

(४) ,, **ह. भा. बळीपसाहेब** जिल्हा उपनिबंधक तसेच त्यांचे सहकारी.

(५) ,, **वसंतराव शिंदे** (अध्यक्ष, मुंबई सहकारी बोर्ड)

(६) ,, **वसंतराव ननावरे** (सहकार मित्र)

(७) ,, **वसंतराव देशमुख** (संचालक, मुंबई सहकारी बोर्ड)

(८) ,, **श्रीरंग पिंपळे**

(९) ,, **ॲड. अशोक गजरे** (संचालक मुंबै बँक.)

(१०) ,, **दिनकरराव पाटील** अध्यक्ष, शिवसागर का. सह. पतपेढी.

(११) ,, **जगन्नाथ खंडेराव जाधव** अध्यक्ष, परळी विभाग सह. पतपेढी

(१२) ,, **शामराव बळीराम निपाणे** उपाध्यक्ष, परळी विभाग सहकारी पतपेढी

(१३) ,, **सर्जेराव रामचंद्र डांगरे** चिटणीस, परळी विभाग सहकारी पतपेढी.

(१४) ,, **श्रीरंग शामराव आरगडे** खजिनदार परळी विभाग सहकारी पतपेढी.

तसेच मुंबै जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे पदाधिकारी, संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग, मुंबई सहकारी बोर्डाचे पदाधिकारी व संचालक मंडळ, परळी विभाग शेतकरी संघाचे सर्व कार्यकर्ते, नागदेवी कामगार सभा पदाधिकारी व कार्यकर्ते व भागधारक ठेवीदार हितचिंतक या सर्वांनी केलेले सहकार्य, मार्गदर्शन व दाखविलेली आपुलकी आणि जिव्हाळा याबद्दल संस्था सर्वांची आभारी आहे.

## श्रध्दांजली :-

पतसंस्थेचे आदरनीय मार्गदर्शक मा. महापौर **कै. बाबुरावजी शेटे,** यांना भावपूर्ण श्रध्दांजली तसेच संस्थेचे ज्ञात अज्ञात सभासदांचे मृत्यूबद्दल तीव्र दुःख होत आहे, मृतांच्या आत्म्यास चिरशांती मिळो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन

**श्री. भरत शिवराम पिंपळे**

चिटणीस

मुंबई दिनांक २१-७-९२

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई-४०० ००४.

## ३१ मार्च १९९२ अखेर संपणाऱ्या वर्षाचे ताळेबंद पत्रक

| मांडवल व देणी | | ३१-३-९२ रुपये पैसे |
|---|---|---|
| **भाग भांडवल** | | |
| अधिकृत भाग भांडवल रु.१०/-चा एक (५०,००० भाग) | | ५,००,०००-०० |
| वसुल झालेले भाग भांडवल (रु. १० चा १ प्रमाणे ११०५५ भाग) | | १,१०,५५०-०० |
| **राखीव निधी व इतर निधी** | | |
| प्रवेश शुल्क | १,६१६-०० | |
| इमारत निधी | ५,५५०-०० | ७,१६६-०० |
| **ठेवी** | | |
| बचत ठेव | ५८ ७०४-९७ | |
| सक्तीची बचत ठेव | २८,२४३-६३ | |
| आवर्त ठेव | १३,६९७-०० | |
| मुदत ठेव | १,५९,३००-०० | |
| दैनिक बचत ठेव | १,७४,५५५-१० | ४,३४,५००-६० |
| **इतर देणी** | | |
| आवर्त ठेव व्याज | २१३-३५ | |
| मुदत ठेव व्याज | ३,९७२-१० | |
| दैनिक बचत व्याज | १,१६२-४५ | ५,३४७-९० |
| | एकूण | ५,५७,५६४-५० |

| संपत्ती व येणी | | ३१-३-९२ रुपये पैसे |
|---|---|---|
| **रोकड व बँक शिल्लक** | | |
| हातातील रोख शिल्लक | | १०,९८१-०२ |
| बँकेतील शिल्लक (मुं.जि.म.स.बँक) | | ५,५४९-१७ |
| **गुंतवणूक** | | |
| मुंबई जि. मध्य. सह. बँक भाग | | १००-०० |
| ,, ,, ,, मुदत ठेव | | २०,०००-०० |
| **कर्ज** | | |
| सभासदांना मध्यम मुदत कर्ज | | |
| दिले | ५,४५,०००-०० | |
| वसुल | ४०,८२५-०० | ५,०४ १७५-०० |
| **इतर येणी** | | |
| कर्जावरील व्याज | | ५,८११-७५ |
| **नफा-तोटा खाते** | | |
| तोटा ३१-३-९२ अखेर | | १०,९४७-५६ |
| | एकूण | ५,५७,५६४-५० |

| श्री. ज्ञानेश्वर बा. वांगडे | श्री. रामचंद्र ब. वाईकर | श्री. भरत शि. पिंपळे | श्री. रामचंद्र धों. वांगडे |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | चिटणीस | खजिनदार |

**श्री. प्रकाश पु. बांबर्डेकर**
(अंतर्गत लेखा परीक्षक)
माझ्या आज रोजीच्या अहवाला प्रमाणे

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई-४०० ००४.

## ३१ मार्च १९९२ अखेरचे नफा-तोटा पत्रक

| खर्च तपशिल | | ३१-३-९२ रुपये पैसे | जमा तपशिल | ३१-३-९२ रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| <u>ठेवीवरील व्याज</u> | | | | |
| आवर्त ठेव | २१३-३५ | | कर्जावरील व्याज | १७,०७५-८२ |
| मुदत ठेव | ३,९७२-१० | | बँक खात्यावरील व्याज | १०२६-०० |
| दैनिक ठेव | १,१६२-४५ | | कर्ज अर्ज फार्म विक्री | १८५२-०० |
| बचत ठेव | ४६०-६० | | किरकोळ उत्पन्न | २,१०८-०० |
| सक्तीची बचत ठेव | ४९३-६३ | ६,३०२-१३ | दंडव्याज | ४७-०५ |
| पगार खर्च | | ३,६३३-२० | | |
| स्टेशनरी छपाई जाहिरात खर्च | | ११,७३१-९० | | |
| किरकोळ खर्च | | ६,०२५-३० | | |
| प्रवास खर्च | | २०९-५० | | |
| ऑफिस खर्च | | | | |
| ऑफिस भाडे | | | | |
| दैनिक कमीशन एजंट | | ५,१५३-४० | तोटा | |
| फर्निचर घसारा | | | ताळेबंदाकडे वर्ग | १०,९४७-५६ |
| | एकूण | ३३,०५६-४३ | एकूण | ३३,०५६-४३ |

| श्री. ज्ञानेश्वर बा. वांगडे | श्री. रामचंद्र ब. वाईकर | श्री. भरत शि. पिंपळे, | श्री. रामचंद्र धों. वांगडे |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | चिटणीस | खजिनदार |

**श्री. प्रकाश पुरुषोत्तम बांबर्डेकर**

अंतर्गत लेखा परीक्षक

माझ्या आज रोजीच्या अहवाला प्रमाणे

# —: प्रमाणित लेखा परिक्षकाचा अहवाल :—

शिवसह्याद्री सहकारी पतपेढी (मर्यादित) या सोसायटीचे दिनांक ३१ मार्च १९९२ रोजीचे ताळेबंद पत्रक व त्यांच दिवशी संपणाऱ्या कालावधीचे नफा–तोटा पत्रक मी तपासले असुन त्या संबंधीचा अहवाल खालील प्रमाणे देत आहे.

(१) अहवाल देण्याकरीता आवश्यक असलेली सर्व माहिती व स्पष्टीकरण मला मिळाले.

(२) माझ्या मते महाराष्ट्र सहकार कायदा १९६० व त्या आधीन असलेले नियम तसेच सोसायटीचे उपविधी यांना अनुसरुन सोसायटीची हिशोबी पुस्तके ठेवण्यात आली आहेत. असे माझ्या तपासणीतुन आढळले.

(३) सोसायटीचे ताळेबंद पत्रक व नफा–तोटा पत्रक सोसायटीच्या हिशेबाच्या पुस्तकांशी मिळती जुळती आहेत.

(४) मला योग्य वाटणाऱ्या माहितीनुसार व मला मिळालेल्या स्पष्टिकरणानुसार माझ्या मते सोसायटीचे संबंधीत हिशेब महाराष्ट्र सहकार कायदा १९६० व अधिनियम १९६१ नुसार आणि मला करण्यात आलेल्या खुलाश्यावरुन आवश्यक ती सर्व माहिती देतात.

अ) सोबत जोडलेले ताळेबंदपत्रक सोसायटीची दि. ३१ मार्च १९९२ रोजीची खरी व योग्य स्थिती दर्शविते.

ब) सोबत जोडलेले नफा–तोटा पत्रक सोसायटीच्या दि. ३१ मार्च १९९२ अखेर वर्षाचा खरा व योग्य नफा दर्शवितात.

सही :–
**प्रकाश पुरुषोत्तम बांवडेकर**
चार्टर्ड अकाऊंटंट

दिनांक १६–७–१९९२.

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

खेतवाडी, मुंबई-४०० ००४.

-: पोट नियम दुरुस्ती :-

| पोट नियम क्र. | सध्याच्या पोटनियमाची शब्द रचना | बदललेल्या नियमाची शब्द रचना | बदलण्याचे कारण |
|---|---|---|---|
| अ. १.१ | कार्यक्षेत्र : संस्थेचे कार्यक्षेत्र बृहन्मुंबईतील "डी वार्ड" पुरते मर्यादित राहील. | कार्यक्षेत्र : संस्थेचे कार्यक्षेत्र बृहन्मुंबईतील "सी.डी.ई. वार्ड" पुरते मर्यादित राहिल. | सभासदांच्या मागणी वरुन. |

# शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित

१०, अतुल निवास, पहिला मजला, खेतवाडी ७ गल्ली, मुंबई-४०० ००४.

संस्था आकर्षक व्याज दराने सभासदांच्या खालील ठेवी स्विकारते

(१) दामदुप्पट ठेव योजना

(२) मुदत ठेव योजना

(३) आवर्त ठेव योजना

(४) दैनंदिन बचत ठेव योजना

(५) बचत ठेव योजना

**BOOK-POST**

सभासद क्र.

प्रति,

श्री./श्रीमती ______________________

______________________

______________________

प्रेषक :

चिटणीस,

**शिवसह्याद्री सहकारी पतपेढी मर्यादित**

१०, अतुल निवास, पहिला मजला,

खेतवाडी ७ वी गल्ली, मुंबई-४०० ००४.

छपाई : सचिन आर्ट प्रिन्टर्स, मुंबई - ४०० ००४.